।। श्रीशंकर ।।

श्रीगणुदास-दास

अनंत विरचित

# श्रीसद्गुरू षोडशोपचार पूजा

श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे

प्रकाशक :
अध्यक्ष, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान
'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ, मेहुणपुरा,
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ०२०–२४४९२४९७
website : http:\\radhadamodar.org.

卐

© सर्वाधिकार सुरक्षित

卐

सहावी आवृत्ती

卐

प्रकाशनकाल:
विजयादशमी
आश्विन शु. १०, शके १९३९
३० सप्टेंबर २०१७

卐

मूल्य : दहा रुपये

卐

अक्षरजुळणी आणि मुद्रक :
पु. स. सहस्रबुद्धे
बालोद्यान प्रेस
१३५८ अ, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२

॥ श्रीशंकर ॥

## सहाव्या आवृत्तीचे प्रकाशकीय

आपल्या हातून श्रीगुरुरायाचे पूजन यथासांग घडावे असे सर्व भाविक भक्तांना वाटत असते. पण दिवसेंदिवस जाणता उपाध्याय मिळणे अवघड होत चालले आहे. खेडेगावात तर फारच उणीव भासते. यामुळे मराठी ओव्यांतून प्रसिद्ध होणारी ही प्रासादिक पूजापद्धती भाविकांना उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

या पूजाकाव्याच्या साहाय्याने कोणासही श्रीसद्‌गुरूंचे पूजन मनासारखे यथासांग करता येईल व समाधान मिळविता येईल.

'षोडशोपचार पूजा' या लहानशाच पण मौलिक पुस्तिकेच्या सहाव्या आवृत्तीचे प्रकाशन करताना आम्हाला अतिशय आनंद वाटतो. 'गुरुः साक्षात् परब्रह्म' एवढी थोरवी गुरुची असते. प. पू. अप्पांनी सद्‌गुरूंचे हे मोठेपण ब्रह्मतत्त्वाची व्यापकता सांगताना प्रारंभीच्या ३४–३५ ओव्यातून फारच मार्मिकपणे व्यक्त केले आहे. असे हे परब्रह्म, सद्‌गुरू संतरूपांनी साकारताना पू. अप्पांची गुरूभक्ती ओवी ओवीतून उत्कटपणे प्रकट होते. त्यांनी आपल्या सद्‌गुरुंसाठी रचिलेली ही पूजा – आपल्या सर्वांना निश्चितच लाभदायी ठरलेली आहे यात शंका नाही.

अध्यक्ष

श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे

॥ श्रीशंकर ॥

# रामकृष्ण हरि जयजय भावाने म्हणा

स्थिती काल देश असो काही का ना ।
राम कृष्ण हरि जय जय भावाने म्हणा ॥धृ०॥

रूप वर्ण वेष असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥१॥
जात पात गोत असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥२॥
आचार विचार उच्चार असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥३॥
नीति कीर्ति वृत्ति असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥४॥
योग भोग रोग असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥५॥
त्याग याग राग असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥६॥
संग रंग ढंग असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥७॥
ऋद्धि सिद्धि बुद्धि असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥८॥
ध्येय देय गेय असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥९॥
ज्ञान ध्यान भान असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥१०॥
हाव भाव गाव असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥११॥
धर्म कर्म वर्म असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥१२॥
धन जन मन असो काही का ना । राम कृष्ण हरि० ॥१३॥

असाल तेथुन पुढती चला यत्न सोडा ना ।
राम कृष्ण हरि जय नित वाचेने म्हणा ॥१४॥

ॐ श्रीः卐

॥ श्रीशंकर ॥

श्रीगणुदास–दास अनंत विरचित

# श्रीसद्‌गुरु षोडशोपचार पूजा

**प्रार्थना**

**श्रीगणेशाय नमः ॥**

**जयजयाजी सर्वेश्वरा । श्रुतिवर्णिता ॐकारा ।**
**सर्वाद्या श्यामसुंदरा । पूर्णब्रह्मा पांडुरंगा ॥१॥**

**दीननाथा भक्तवत्सला । अघमलहरा हे विठ्ठला ।**
**संतमानसमराळा । परमोदारा पंढरीशा ॥२॥**

**सज्जनचित्तचिंतामणी । कल्पवृक्षा चक्रपाणी ।**
**देवाधिदेवा कैवल्यदानी । सर्वाधारा सर्वशक्ते ॥३॥**

**जे जे विश्वाठायी काही । होते आहे होणार पाही ।**
**तेथे तो तुजविण नाही । कोणताहि ठाव दुजा ॥४॥**

**तू नित्य निरंजन अद्वैत । पूर्ण केवळ गुणातीत ।**
**अक्षय विकारवर्जित । सर्वव्यापी अखंड ॥५॥**

**तू आकाशाचा प्रकाश । तू विविधतेचा विशेष ।**
**तू जीवनाचा चिदंश । सर्व गतीचे केंद्र तू ॥६॥**

**भास्कराची तेजस्विता । सुधांशूची आह्लादकता ।**
**जाह्नवीची निर्मलता । साकारलीसे तव रूपे ॥७॥**

**पवित्रता श्रीगोदेची । उत्तुंगता हिमालयाची ।**
**विशालता वा सागराची । तव सत्ते अनुभवा ये ॥८॥**

सर्व सृष्टीचे सौंदर्य । कलागुणांचे माधुर्य ।
सर्व शास्त्रांचे तात्पर्य । जीवन घेई तुजमाजी ।।९।।

शास्त्रज्ञांचे संशोधन । विद्वानांचे प्रतिपादन ।
प्रतिभापतीची रचना पूर्ण । ओघ तुझ्या सागरीचे ।।१०।।

तू सर्व पंथांचे गंतव्य । तू सर्व साधनांचे प्राप्तव्य ।
तू सर्व विचारांचे मंतव्य । निःसंशय पांडुरंगा ।।११।।

भूते झाली गुणमयी । तुझ्यामुळेच शेषशायी ।
इंद्रियांना बोध होई । तुझ्या सत्ते पंढरीशा ।।१२।।

संकल्प विकल्प मनाचे । विवेक निर्णय बुद्धीचे ।
चैतन्य अथवा जीवांचे । तव शक्तीने घडलेसे ।।१३।।

जाणवे जो मीतूपणा । तो तुझाच नारायणा ।
द्वंद्वांमाजी शीतोष्णा । एकरूपता तुझी वसे ।।१४।।

जनन विकास विनाश । तव लीलेचे मात्र अंश ।
होणे जाणे एक भास । तुझ्या व्यापक सत्तेचा ।।१५।।

ज्ञान कर्म भोगाठायी । अहंकारादि भावे पाही ।
त्रिपुटी जी भासमयी । ती तुझ्याचि साक्षेपे ।।१६।।

तू भज्य भक्त भजन । तू होम होता हवन ।
तू साध्य साधक साधन । कर्ता कर्म कारण तू ।।१७।।

सर्व गुणांचा फुलोरा । सर्व भावांचा पसारा ।
साधनांच्याहि संभारा । गुणातीता धरिसी तू ।।१८।।

तुज वर्णिता विश्वपती । वेद म्हणती 'नेति नेति' ।
विशालबुद्धि भय पावती । नाहीच म्हणती अज्ञानी ।।१९।।

तुजप्रति शोधू जाता । विस्मय वाटे पंडिता ।
चकित होऊन विविधता । पाहती तुज एकात ।।२०।।

विवर्त परिणाम विकास । योगायोग कोणी विलास ।
कोणी अजातवादास । प्रतिपादिती तव सत्ते ।।२१।।

कोणी अविकृतपरिणामवादी । कोणी म्हणती पूर्णवादी ।
कोणी अनध्यस्त विवर्तवादी । आपुलेचि म्हणती खरे ।।२२।।

तुझी शक्ति हिरण्मय । प्रयत्नासी अजेय ।
मोहक तिचे रूप बाह्य । तत्त्वज्ञांना भ्रांत करी ।।२३।।

तिचे पडता आवरण । सत्य जाते झाकून ।
सत्याभासाचे तत्त्वज्ञान । पंडित उभे करिताती ।।२४।।

साधकांची पातळी । मुळीच राहे वेगळाली ।
म्हणोनी संत माउली । विविध योगा स्वीकारिती ।।२५।।

सर्वातीता एक तुला । संतजनांनी आकळिला ।
भक्तिबळे उभा केला । दीनासाठी विटेवरी ।।२६।।

मनबुद्धीसी अगोचर । तुझे स्वरूप परात्पर ।
लीलाविग्रही पद्मकर । सगुण होशी अनंता ।।२७।।

तुझे गाती पवाडे । व्यासादिक ज्ञान–गाढे ।
दीन होउनि बापुडे । क्षमायाचना करिताती ।।२८।।

तेथे माझा पाड किती । परी उसळे शब्दवृत्ति ।
म्हणोनि तिलाच रुक्मिणीपती । तव चरणी वाहतो ।।२९।।

हे अनाथजनविश्रामा । सन्नीतीच्या उद्गमा ।
तुझा आहे अगाध महिमा । कृपा मजवरी करावी ।।३०।।

हे संतमानसविहंगा । श्रीविठ्ठला पांडुरंगा ।
दयानिधे भवभयभंगा । सर्वप्रिया रुक्मिणीशा ।।३१।।

तूच सिंदुरारि गजानन । तूच सविता नारायण ।
भगवान् श्रीवृषवाहन । तूच अससी सर्वथा ।।३२।।

महाकाली आद्यशक्ति । विद्यादायिनी सरस्वती ।
लक्ष्मी पद्मा विमलकीर्ति । रूपे तुझ्याच शक्तीची ।।३३।।

तव पदकमलां वंदन । करोनि हे जगज्जीवन ।
मम सद्गुरूंचे पूजन । भावे आता आरंभितो ।।३४।।

श्रीशंकरा भक्तप्रिया । मोरेश्वरा परमसदया ।
शारदा दुर्गा विष्णुप्रिया । पावा वेगे दासासी ।।३५।।

कृपासागरा श्रीज्ञानेश्वरा । तुकारामा करुणाकरा ।
रामदासा गुरुवरा । वंदन तुमचें पदांसी ।।३६।।

सांई सद्गुरो वामना । प्रसन्न व्हावे दयाघना ।
दुराग्रही चंचल मना । माझ्या एकाग्र करावे ।।३७।।

मी हीन दीन चलचित्त । साधनसंभारे वर्जित ।
आपुल्या आशीर्वादे खचित । समर्थ होईन पूजेसी ।।३८।।

**वाडवडील पूर्वजांची । पुण्याई ऋषिमुनींची ।**
**कृपादृष्टि ग्रहांची । निर्विघ्न करो मम कार्या ।।३९।।**

**आसन :**

**भूमि क्षमा करो स्थिर । जल होवो विमल मधुर ।**
**मांगल्य सर्व दिशांतर । व्यापून राहो देवताकृपे ।।४०।।**

**न्यास :**

**पुण्यक्षेत्री मार्गक्रमण । पुण्यभूमी देवदर्शन ।**
**कराया पुण्यतीर्थी स्नान । गमन वसो चरणांसी ।।४१।।**

**देवालयी सद्वर्तनी । भजनी पूजनी कीर्तनी ।**
**सज्जन-संत-सन्निधानी । वसो कटीसी बैसका ।।४२।।**

**पाळून धर्म शिष्टाचरण । टाळून वंचना परपीडन ।**
**मी जे मिळविले शुद्ध अन्न । वसो माझ्या उदरी ते ।।४३।।**

**संतचरणसंवाहन । भजनीसाथ यज्ञ दान ।**
**देशसेवा देवतार्चन । वसो माझ्या करासी ।।४४।।**

**सद्वासना सन्नीति । संतोष प्रसन्नता धृति ।**
**श्रद्धा प्रेम यांची वसती । होवो हृदयी माझिया ।।४५।।**

**नामजप कंठी वसो । कर्णी संतवचन विलसो ।**
**परमेशाची मूर्ती दिसो । नयनी सदा माझिया ।।४६।।**

**सच्चिदानंदाचा विचार । सत्य वस्तूचा निर्धार ।**
**ज्ञान जे का निर्विकार । माझ्या राहो मस्तकी ।।४७।।**

ऐसा आपादमस्तक । पावन झालो निःशंक ।
कारण संत देती भाक । सद्भावाने शुचिता ये ।।४८।।

**कलशपूजन :**

चारी वेद तिन्ही देव । द्वीपे आणि अर्णव ।
कलशा तुझे ठायी सर्व । आश्रयाने राहती ।।४९।।

गायत्री नि सावित्री । शुचिता शांती पुष्टिदात्री ।
देवगणासह धरित्री । पूजार्थ होवो साधक ।।५०।।

गंगे यमुने गोदावरी । नर्मदे सिंधु कावेरी ।
तुंगे वितस्ते तव वारी । वरुणकृपे मज लाभो ।।५१।।

**शंखपूजन :**

पावित्र्यासह तीर्थें सारी । वसती शंखा तवोदरी ।
भगवंताने निज करी । कौतुकाने धरिले तुज ।।५२।।

तू सागराचा आत्मज । कमलेचा प्रियानुज ।
हे पांचजन्या तुज । नमस्कार असो माझा ।।५३।।

**घंटिकापूजन :**

हे घंटिके मंजुल रवे । देवतांना निमंत्रावे ।
दुष्टां दूर करावे । निज निनादे यावेळी ।।५४।।

**दीपपूजन :**

दीपा तू ब्रह्मरूप । प्रकाशाचा निधि अमूप ।
निवारी तम पाप ताप । सांग पूजन करावे ।।५५।।

**मार्जन :**

**शंख कलश जलाने । मार्जन करितो भावाने ।**
**तत्स्पर्शे पूजासाधने । मजसह योग्य होवोत ।।५६।।**

**गुरुपूजनाची पात्रता । मज झाली प्राप्त आता ।**
**म्हणोनि भावे सद्गुरुनाथा । आवाहन हे करीतसे ।।५७।।**

**आवाहन-प्रार्थना :**

**हे संतचरित्रगायका । अनाथजनसंरक्षका ।**
**शिवलिंगमंडित मस्तका । ज्ञानदात्या संतकवे ।।५८।।**

**हे गौतमीगोदाप्रिया । भीमातटनिवासिया ।**
**विठ्ठलचरणी कृतालया । पुण्यवंता प्रसीद माम् ।।५९।।**

**गणेश असे आपुले नाम । जे मांगल्याचे मंगलधाम ।**
**आपुली कृपा निष्काम । भक्तिभावा उपजविते ।।६०।।**

**आसन, अर्घ्यपाद्य :**

**भावे करितो आवाहन । स्वीकारा हे आसन ।**
**वात्सल्यभावे बसून । अर्घ्यपाद्य स्वीकारा ।।६१।।**

**गंगाजले आचमन । देतो आपणालागुन ।**
**तेवी तीर्थोदके स्नान । घालितो ते सेवावे ।।६२।।**

**पंचामृत - दूध :**

**पुष्टिदायी गोड धवल । जेवी कृपावात्सल्य ।**
**त्या दुग्धाने स्नेहाळ । स्नान घालितो आपणा ।।६३।।**

दही :

जीवनातले रागद्वेष । वृत्तीतले हर्षामर्ष ।
त्यांचे प्रतीक जे विशेष । दही ते पायी घालितो ।।६४।।

तूप :

ज्योतींचे जे जीवन । जे आयुष्याचे वर्धन ।
सद्‌बुद्धीचे दीपन । गोघृत ते मी वाहतो ।।६५।।

मध :

मोठा वृक्ष लहान क्षुप । नाना गंध रंग रूप ।
विविधता विश्वी अमूप । सार त्यांतील घेतले ।।६६।।

तेही न केवळ स्वार्थास । उपयोग व्हावा परास ।
असा तो मध, आपणास । वाहतो मी गुरुवरा ।।६७।।

साखर :

जी निष्काम प्रेमापरी । जीवना आणी माधुरी ।
ओलाव्याने सत्वरी । विरघळुनी जातसे ।।६८।।

रुचिमात्र जी केवळ । निरुपाधिक वर्ण धवल ।
ती ही शर्करा उज्ज्वल । पदावरी वाहतो ।।६९।।

गंधोदक :

सद्भावाचे चंदन । निष्ठेवरी उगाळून ।
भक्तिजलात मिसळून । वाहतो मी चरणांसी ।।७०।।

ऐसे सहा स्नानोपचार । पदी वाहिले साचार ।
ज्यांच्या प्रसादे षड्विकार । जावोत माझे विलयाला ।।७१।।

**पुष्पविसर्जन :**

प्रक्षाळुनी शुद्ध जले । वाहतो मी गंधफुले ।
मग उत्तरेसी विसर्जिले । अभिषेकास्तव तयासी ।।७२।।

**अभिषेक :**

देवता तीर्थे संतजन । यांचे करुनि नामस्मरण ।
तेच मंत्रसूक्त मानून । अभिषेकितो गुरुराया ।।७३।।

विश्वा विष्णु वषट्कारा । भूतभव्या परात्परा ।
सर्वाधारा सर्वेश्वरा । अनाद्यनंता जगत्पते ।।७४।।

बदरीशा नारायणा । जगन्नाथा पतितपावना ।
व्यंकटेशा लक्ष्मीरमणा । द्वारकाधीशा श्रीरंगा ।।७५।।

मत्स्य कूर्म वराह नरहरी । वामन परशुराम रावणारी ।
कृष्ण कलंकी धन्वंतरी । बुद्ध माधव गोपाळ ।।७६।।

विश्वनाथ सोमनाथ । केदारेश्वर नागनाथ ।
मल्लिकार्जुन अमरनाथ । वैजिनाथ घृष्णेश्वर ।।७७।।

महाबळेश्वर ओंकार । महंकाल रामेश्वर ।
नीळकंठ कर्पूरगौर । वृषभध्वज पार्वतीपति ।।७८।।

पांडुरंग भक्तवरद । केशव रमाधव गोविंद ।
संकर्षण अनिरुद्ध । श्रीविठ्ठल भक्तप्रिय ।।७९।।

संतसज्जनविश्राम । भाविकांचे आश्रयधाम ।
गोपगोपींचें मूर्त प्रेम । राधारमण वासुदेव ।।८०।।

दामोदर नंदकुमार । यशोदाप्रिय शाङ्‌र्गधर ।
राम राघव धनुर्धर । सर्वशक्ति सर्वात्मा ।।८१।।

निवृत्तिनाथ ज्ञानदेव । सोपान मुक्ता चांगदेव ।
विसोबा गोरोबा नामदेव । सेना चोखा सांवता ।।८२।।

कबीर तुलसीदास एका । बोधला रोहिदास राका ।
दामाजी नरहरी शेखा । चैतन्य मेहता नाभाजी ।।८३।।

मुकुंद लाखा महिपती । तुकाराम विमलकीर्ती ।
रामदास पुण्यमूर्ती । सांई सद्‌गुरु वामन ।।८४।।

गणेश एकदंत गजवदन । सूर्य भास्कर कमलासन ।
दुर्गा जी सिंहवाहन । सीता सावित्री रेणुका ।।८५।।

लक्ष्मी विद्या सरस्वती । अहल्या रमा पुण्यकीर्ती ।
मीरा जनी सखुसती । जपतो भावे वरचेवरी ।।८६।।

या अष्टोत्तरशतनामेकरून । घालितो मी तुम्हा स्नान ।
प्रसन्न व्हावे दयाघन । कृपावर्षाव करावा ।।८७।।

आपुल्या कृपे माझे हित । होवो सर्वदा प्रतिष्ठित ।
हृदयाचा सर्व हेत । भक्तिभावात रहावा ।।८८।।

वस्त्र :

श्रद्धा प्रेमाच्या तंतूने । निर्लोभतेच्या रंगाने ।
युक्त भाव गंधाने । ऐसे वस्त्र समर्पितो ।।८९।।

**अक्षता :**

**संपूर्णता नि शुद्धता । अनन्यतेच्या प्रतीकभूता ।**
**वाहतो त्या अक्षता । देवा प्रेमे आपणासी ।।९०।।**

**आलेपन :**

**हरिद्रा कुंकुम अष्टगंध । गुलाल बुक्का जो सुगंध ।**
**तुलसी अलंकारा सिद्ध । वाहतो तेवी गंध फुले ।।९१।।**

**पुष्प :**

**शेवंती चाफा पाटल । पुन्नाग मोगरा बकुल ।**
**कमल अनंत बिल्वदल । वाहतो मी दूर्वांसह ।।९२।।**

**धूप, दीप, कर्पूर :**

**सद्‌गुणांचा आह्लाददायी । धूप भावे अर्पितो पायी ।**
**सद्वर्तनाचा सर्वठायी । दीप लावितो दयाळा ।।९३।।**

**हे धूप दीप अर्पितो । कर्पुराने ओवाळितो ।**
**ज्या ज्योतीने उजळतो । हृदयी भक्त ज्ञानाने ।।९४।।**

**नैवेद्य :**

**नैवेद्यास्तव आपणासी । साध्या सुग्रास अन्नासी ।**
**अर्पितो मी प्रेमराशी । त्याने व्हावे संतुष्ट ।।९५।।**

**पाणी, अपोषण, चंदन :**

**पानीय आणि अपोषण । हस्तमुखप्रक्षालन ।**
**उटण्यासाठी चंदन । स्वीकारावे गुरुराया ।।९६।।**

**विडा :**

त्रयोदशगुणी तांबूल । पर्णे ज्यांतील कोमल ।
कुटून घातिले पूगीफल । बदाम केशर संयुक्त ।।९७।।

**दक्षिणा :**

मद्भावाची दक्षिणा । वाहतो मी गुरुचरणां ।
प्रसन्न होऊन गुरुराणा । इच्छित माझे देवो मज ।।९८।।

**प्रदक्षिणा :**

घालितो प्रदक्षिणा तीन । करितो साष्टांग वंदन ।
मज अज्ञाचे आराधन । स्वीकारावे महाराजा ।।९९।।

**प्रार्थना :**

मी मतिमंद अज्ञान । न जाणे आवाहन ।
पूजाविधी समर्चन । नाही मजसी ठाउकी ।।१००।।

मंत्र नाही, तंत्र नाही । क्रिया–विधान तेही नाही ।
भक्तिभावाविना पाही । कोरडा आहे सर्वदा ।।१०१।।

या माझ्या उणिवांसी । कोण निवटील कृपाराशी ।
शरण आपुल्या चरणांसी । आलो अनन्य भावाने ।।१०२।।

जाणता नेणता अपराध । असंख्य करितो मी मतिमंद ।
परी कारुण्य आपुले अगाध । क्षमा करावी महाराजा ।।१०३।।

आपुल्या कृपेचा आधार । लाधता मशी सत्वर ।
सर्व दैन्यदु:खापार । होईन मी निश्चये ।।१०४।।

कर्णी पडो संतकीर्ती । हृदयीं राहो सद्भक्ती ।
वाणी नामजपावरती । राहो सर्वदा गुंतोन ।।१०५।।

देशसेवा परोपकार । घडो मजसी निरंतर ।
स्वार्थबुद्धीसी अवसर । राहो न कधीं वर्तनी ।।१०६।।

संयम यावा वृत्तींना । सदा स्फुरावी सद्भावना ।
आळसादि दुर्गुणांना । थारा कधींहि नुरावा ।।१०७।।

कोणत्याहि स्थितीत । शांत प्रसन्न राहो चित्त ।
समाधान वसो वृत्तीत । चंचलपणा टाको मन ।।१०८।।

हेच आपुल्या चरणांसी । आहे मागणे विशेषी ।
बालकाने मातेसी । हितकर काय मागावे ।।१०९।।

तरी न रहावे म्हणून । मी हे केले भाषण ।
क्षमा पुन्हा मागून । वंदने चरणी अर्पितो ।।११०।।

भाग्य आपुल्या पूजनाचे । लाधले पूर्वसुकृते साचे ।
त्यात साफल्य जीवनाचे । लाभून झालो कृतार्थ ।।१११।।

आपुला वरदहस्त शिरी । आहेच आहे निरंतरी ।
तो स्पर्श कोमल परोपरी । अनंतास सुखवीतसे ।।११२।।

शांति: पुष्टि: तुष्टि: च अस्तु.

गुरुपौर्णिमा १८८८ अनंत आठवले

॥ श्रीशंकर ॥

# श्रीसद्गुरु प्रार्थना

सदा प्रभुपदावरी निज समर्पिलीसे तनु ।
कथेत मन गोविले कमल मालिकेसी जणु ॥
मुखांतुन जसा झरा सगुण भक्तिचा वाहतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ॥१॥
कवीस गिरिशापरी नगरदेश वेषें दिसे ।
गणेश करि सार्थ ते अवतरोनि ज्यांच्या मिषे ॥
बघून मतिवैभवा विबुधसंघही डोलतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ॥२॥
जरी अधम चाकरी कवन हीनशी लावणी ।
निकृष्टजन भोंवती परि न लिप्त तद्दुर्गुणी ॥
पटासह असूनही 'जर' खरा न की रंगतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ॥३॥
नवीन कविता जणो हृदय–वाटिकेभीतरी ।
सदा उमलतात या तुळशिच्या शुचि मंजिरी ॥
तिहींचि परमादरेंकरुन पूजिला ईश तो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ॥४॥
जयांस परमेश्वरे हृदय दूसरे मानिले ।
सुशब्दमयमंदिरी सकल संत ते स्थापिले ॥
महीपति जणो गमे फिरुन भूवरी शोभतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ॥५॥

करी विशद भाव जी परिमले अशी मंजिरी ।
जयी विरचिली असे अनुभवामृताचे वरी ।।
म्हणून इतरेजना सुगम जाहला बोध तो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ।।६।।
यदीय हरिकीर्तने नयन ढाळिती आसवे ।
सुधाकरकरे जसा विमल चंद्रकान्त स्त्रवे ।।
सदैव कर जोडुनी 'करुण' ज्यापुढे ठाकतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ।।७।।
प्रसाद कवितेमधे वसत कलिदासापरी ।
रसाळ बहु बोलणे जणु सुधेतली माधुरी ।।
विराग हृदयामधे शुचिपणासवे नांदतो ।
समर्थ गणुदास ते सतत मी नमस्कारितो ।।८।।
अनाथजनवत्सला गुरुवरा दयेच्या घना ।
त्वदीय चरणी असे विनत एकचि प्रार्थना ।।
तरंग उठती सदा विकृत संशयाचे जिथे ।
असे कुटिल जे करा सरळ सद्‌गुरो चित्त ते ।।९।।
अजून हरिच्या पदी मन मदीय हे ना जडे ।
मुखी भजन चालता नयन राहती कोरडे ।।
वरीत मति तर्कटा, सरलतेसवे वाकडे ।
अता तुम्हीच वंचिले तरि बघू कुणाच्याकडे ।।१०।।
हरिस्मरण झालिया गहिंवरून यावा गळा ।
उठोत पुलकावली नयन ढाळु द्या की जला ।।

तुम्हातिल असा मिळो लव तरी जिव्हाळा अम्हा ।
अनंत अपुला म्हणा मग नसे कशाची तमा ।।११।।

## श्री सद्‌गुरु वन्दनम्

सद्‌गुरुं केवलानंदं प्रणताखिलमंगलम् ।
विभुं सन्तकविश्रेष्ठं वन्दे दासगणुं गुरुम् ।।१।।
नगरप्रांतकासारप्रफुल्लाब्जमनोहरम् ।
भक्तिप्रेमरसाकीर्णं वन्दे दासगणुं गुरुम् ।।२।।
नन्दीतटप्रियं शान्तं गोरटेग्रामभूषितम् ।
भक्तिमार्गप्रणेतारं वन्दे दासगणुं गुरुम् ।।३।।
कर्म–भक्ति–ज्ञान–रूप–त्रिपुंड्रतिलकांकितम् ।
मृदुलारक्तहस्ताग्रं वन्दे दासगणुं गुरुम् ।।४।।
वात्सल्यकरुणादृष्टिं प्रभुं तातं पितामहम् ।
गौरवर्णं महोरस्कं वन्दे दासगणुं गुरुम् ।।५।।
सच्छीलकांतिं दातारं शिवलिंगांकशेखरम् ।
क्षमया तुदिलं भव्यं वन्दे दासगणुं गुरुम् ।।६।।
गायकं सच्चरित्रस्य सत्पूरूष गुणालयम् ।
भक्तमानसकल्पद्रुं वन्दे दासगणुं गुरुम् ।।७।।
महाराष्ट्रीयभाषायाः भूषणं च महाकविम् ।
प्रसादकविताकान्तं वन्दे दासगणुं गुरुम् ।।८।।
भक्तिगोदातीरवासं भक्तिगोदाविहारिणम् ।
भक्तिगोदाजले स्नातं वन्दे दासगणुं गुरुम् ।।९।।

श्रीविठ्ठलपदांभोजे रसास्वादनलोलुपम् ।
गुंजंतं नामसाहस्त्रं वन्दे दासगणुं गुरुम् ।।१०।।
पुंडरीकपुरे शश्वत् भीमरथ्यास्तटे शुभे ।
पांडुरंगपदे लीनं वन्दे दासगणुं गुरुम् ।।११।।
सन्मार्गदीपकं नाथं प्रसन्नं पावनं शुभम् ।
अनंतवरदं नित्यं वन्दे दासगणुं गुरुम् ।।१२।।

## श्रीदासगणु महाराज यांची आरती

जयदेव जयदेव जय सद्गुरुराया । जय गणुदासा सदया ।
अनाथजन–सुखधामा वंदन तव पाया ।।ध्रु०।।
नगरप्रांती सहस्त्रबुद्धे वंशात ।
अवतरलासे कविवर महिपति साक्षात ।।
प्रसादमय कवनांनी वर्णियले संत ।
भक्तिरसी रंगविले जनतेचे चित्त ।। जयदेव ।।१।।
करुणावत्सल वरदा भव्य धीर मूर्ति ।
दृष्टि प्रेमळ निववी विनतांची आर्ति ।।
आशीर्वचने सहजे इच्छांची पूर्ति ।
सात्त्विकभावा लाभे सहवासे स्फूर्ति ।। जयदेव ।।२।।
नामसहस्त्री रसना राहतसे दंग ।
निजमहतीचा कधि ना मिरवियला ढंग ।।
व्यवहारी वागुन नच वैराग्या भंग ।
प्रशांत मुद्रा, भाली शोभत शिवलिंग ।। जयदेव ।।३।।

जीवविली वाढविली भक्ति रंगविली ।
संतस्थिति आचरणी बाणुन दाखविली ।।
क्षुब्ध मने, तप्त शिरे, स्पर्शे शांतविली ।
कृपाप्रसादे दैन्ये कितिकांची हरिली ।। जयदेव ।।४।।
भक्तवरा! संतकवे!! दीनजनां जननी ।
मम नयनी तुजवांचुन अन्य न या अवनी ।।
तृप्तमने बुद्धि स्थिर, रंगो हरिभजनी ।
अनंत नित हे याचित शुभ पावन चरणीं ।। जयदेव ।।५।।

अनंत आठवले

## श्रीसद्गुरु प्रार्थना

(चाल – करुणानिधे प्रभो नो)

करुणाकरा अनंता । वरदा सदा असावे ।
ते छत्र सत्कृपेचे । केव्हा न अंतरावे ।।धृ।।
वचने तुझी आम्हाला । कळली परी न वळली ।
मनबुद्धिलाहि अजुनी । स्थिरता मूळी न आली ।
आळसा दुरी धराया । आम्हांस जागवावे ।
करुणा करा अनंता । वरदा सदा असावे ।।१।।
श्रद्धा जरी असे ती । निष्ठेचि वानवा ती ।
वाचन श्रवण होते । आचरणी नाही वृत्ती ।
ज्ञानेश होऊनीयां । कर आमुचे धरावे ।
करुणा करा अनंता । वरदा सदा असावे ।।२।।

गुरुपंथ चालवाया । दे शक्ति तूच सदया ।
दोषास घाली पोटी । शिशुवरति ठेवी माया ।
तवमार्गि चालण्या या । हृदि आमुच्या वसावे ।
करुणा करा अनंता । वरदा सदा असावे ।।३।।

## श्रीस्वामी वरदानंद भारतींची आरती

आरती अनंत सद्गुरुची । वरदानंद भारतींची ।।धृ।।
येउनी सकल संत जगती । आपुले ठायी अवतरती ।
लाभली ममता दादांची । वत्सल पाखर मातेची ।
(चाल) जाहली कृपा शारदेची । जाहली कृपा... ।
बोधण्या आर्य, भूमिचे शौर्य, त्यासवे धैर्य ।
निर्मिती केली काव्याची । मातृभूमिच्या वैभवाची ।।१।।
कृष्णकाव्याचि चंद्रभागा । ब्रह्मसुत्रार्थ होय गंगा ।
खंडिले आक्षेपी शब्दा । माय गीतार्थ जणू गोदा ।
(चाल) मनुस्मृति हीच सिन्धु झाली । मनुस्मृति हीच... ।
शमविती पाप, निववित्ती ताप, हरिति संताप ।
आमुची तीर्थे ही साची । बुद्धि, बल, शक्ती प्राप्तीची ।।२।।
निवेदित आत्मभक्ति झाली । पालवी नारायण जवळी ।
समाधी संजीवन झाली । जणु श्री योगेश्वर माउली ।
(चाल) आता पदीं एक विनति । आता पदीं... ।
तुम्हि दाविल्या, पथी त्या भल्या, अनुसरुनिया ।
जडावे चित्त हरिपायी । रहावे सदा तुम्ही हृदयी ।।३।।

# यतिपूजन मंत्राः ।

नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये ।
सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते ।
सहस्रकोटियुगधारिणे नमः ।।१।।

नमः कमलनाभाय नमस्ते जलशायिने ।
नमस्ते केशवानन्त वासुदेव नमोऽस्तु ते ।।२।।

वासनाद्वासुदेवस्य वासितं भुवनत्रयम् ।
सर्वभूतनिवासोऽसि वासुदेव नमोऽस्तु ते ।।३।।

शंकरं शंकराचार्यं केशवं बादरायणम् ।
सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ।।४।।

ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेदविभागिने ।
व्योमवद् व्याप्तदेहाय दक्षिणामूर्तये नमः ।।५।।

कर्पूरगौरं करुणावतारं । संसारसारं भुजगेन्द्रहारम् ।
सदा वसन्तं हृदयारविन्दे । भवं भवानीसहितं नमामि ।।६।।

असितगिरिसमं स्यात् कज्जलं सिंधुपात्रे ।
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी ।।
लिखति यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं ।
तदपि तव गुणनामीश पारं न याति ।।७।।

त्वमेव माता च पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देव देव ।।८।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: सन्ति देवा: ।
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वै: श्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नम: ।।९।।

ॐ विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो ।
विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात् ।।

संबाहुभ्यां धमति संपतत्रै
द्यावाभूमिं जनयन् देव एक: ।।१०।।

नानासुगंधपुष्पाणि यथाकालोद्भवानि च ।
भक्त्या दत्तानि पूजार्थं गृहाण परमेश्वर ।।११।।

– नम: पार्वतीपते हर हर महादेव –

❀❀❀

॥ श्रीशंकर ॥

## प. पू. स्वामी श्रीवरदानंदभारती (प्राचार्य अ. दा. आठवले) यांची ग्रंथसंपदा

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| १) | अनुवाद ज्ञानेश्वरी (ओवीबद्ध)<br>मूळ ज्ञानेश्वरी ग्रंथाचा रसप्रवाह अबाधित ठेवून सुलभ मराठीत केलेला प्रासादिक अनुवाद | ३०० |
| २) | अप्रकाशित वाङ्मय (गद्यखंड)<br>स्वामीजींचे यात्रा वर्णन, तात्त्विक निबंध, टीकात्मक/आयुर्वेदीय/आत्मकथनपर इ. अप्रकाशित गद्य लेखन | १५० |
| ३) | अप्रकाशित वाङ्मय (पद्यखंड)<br>स्वामीजींचे चिंतनपर, उपदेशपर, वर्णनपर, राष्ट्रीय विचारपर अप्रकाशित काव्य | १२० |
| ४) | अष्टाङ्ग संग्रह<br>आयुर्वेदाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त असा एक प्रधान ग्रंथ | उपलब्ध नाही |
| ५) | आठवणी आप्पांच्या<br>स्वामी वरदानंदभारतींच्या डॉ. ग. प्र. परांजपे लिखित आठवणी | ६० |
| ६) | आत्मानुसंधान<br>श्रीशंकराचार्यांच्या योगतारावली (ओवीबद्ध) व परापूजा (गद्य) या दोन प्रकरणग्रंथावरील विवेचन | १५ |
| ७) | आयुर्वेदीय व्याधिविनिश्चय<br>आयुर्वेदीय रोगनिदान, कायचिकित्सा | ६५० |
| ८) | आमचे अप्पा आमचे स्वामी – स्मृतिगंध<br>प.पू. अप्पांविषयीच्या हृद्य आठवणींचे डॉ. चं. द. इंदापूरकर व डॉ. ग. प्र. परांजपे यांनी केलेले संकलन | १८० |

### उपनिषदर्थ कौमुदी (मूळ संहितेसह) रसाळ/ओजस्वी गद्य/पद्य विवेचन

| | | |
|---|---|---|
| ९) | खंड १ ला (गद्य) – ईशावास्य व मांडुक्य उपनिषदे (गौडपादकारिकांसह) | १५० |
| १०) | खंड २ रा (ओवीबद्ध) – केन, कठ, प्रश्न, मुंडक, ऐतरेय, तैत्तिरीय ही सहा उपनिषदे | २२० |
| ११) | खंड ३ रा (ओवीबद्ध) – छांदोग्योपनिषद् | ३०० |
| १२) | खंड ४ था (गद्य) – बृहदारण्यकोपनिषद् | २४० |
| १३) | खंड ५ वा (ओवीबद्ध)<br>श्वेताश्वतर व श्रीमहानारायण उपनिषदे आणि उपनिषद् विषयक काही महत्त्वाची प्रश्नोत्तरे (संग्रहित) | २६० |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| १४) | तैत्तिरीय उपनिषद् (ओवीबद्ध) – खंड २ मधून पारायणासाठी छापलेली प्रत | ५० |
| १५) | कथा संस्काराच्या– संस्कृतीच्या<br>संस्कार व संस्कृतीच्या कथांचे संकलन | उपलब्ध नाही |
| १६) | कनकधारा स्तोत्र<br>श्रीशंकराचार्य विरचित लक्ष्मीस्तोत्रावरील स्वामीजींचे विवेचन | १५ |
| १७) | करुणानिधे<br>स्वसंस्कृती, स्वभाषा, स्वधर्म आणि स्वदेश याबद्दल जाज्वल्य स्वाभिमान करणारे भाष्य | १० |
| १८) | कालिके स्मरुनी पाया<br>शालिवाहन काव्यातील प्रथम सर्ग व गद्य श्लोकार्थासह युवकांसाठी मार्गदर्शन | १५ |
| १९) | कुटुंबव्यवस्था<br>प्राचार्यांनी विविध ग्रंथातून मांडलेल्या विचाराच्या आधाराने | १५ |
| २०) | खरा ब्राह्मण<br>प्राचार्यांनी विविध ग्रंथातून मांडलेल्या विचाराच्या आधाराने | १० |
| २१) | गंगागौरव<br>प्राचीन–अर्वाचीन कवींनी गंगेवरती केलेल्या काव्याचा अर्थ व त्यावरील श्री.वा.ना.उत्पात यांचे भाष्य असलेला ग्रंथ | १५० |
| २२) | गंगालहरी (मूलमात्र) – श्रीजगन्नाथ पंडित विरचित गंगालहरी | ५ |
| २३) | गंगालहरी (गंगातीरविहारिणी)<br>श्री. राम पिंगळीकरकृत वृत्तबद्ध मराठी अनुवादासह प्राचार्यांनी वरील काव्याचा भावानुसारी क्रम लावून केलेला अनुवाद | ३० |
| २४) | ताटीचे अभंग<br>रुसलेल्या, दार बंद करून बसलेल्या ज्ञानेश्वरांना दार उघडण्यासाठी विनंति करणारे मुक्ताबाईच्या अभंगांवरील भाष्य | ५० |
| २५) | तेजाचं चांदणं<br>प्राचार्य अ.दा.आठवले तथा प.पू. स्वामी वरदानंद भारती यांचे जीवन चरित्र | ४०० |
| २६) | तेजोनिधी<br>सौ. वसुधा देशपांडे (बेंगलोर) यांनी लिहिलेले प.पू. स्वामी वरदानंदभारतींचे संक्षिप्त चरित्र | १४० |
| २७) | निर्वाणषटकम् – आद्य शंकराचार्यांच्या निर्वाणषटकावरील विवेचन | १५ |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| २८) | प.पू. स्वामी वरदानंदभारती यांचे ओवीबद्ध चरित्र<br>डॉ. ग. प्र. परांजपे रचित | १२० |
| २९) | पूर्वरंग तरंग – कीर्तनातील पूर्वरंगाच्या पदांवरील मनोज्ञ विवरण | ६० |
| ३०) | पूर्वरंग तरंगिणी – कीर्तनातील पूर्वरंगाच्या पदांवरील मनोज्ञ विवरण | ७५ |
| ३१) | ब्रह्मसूत्रार्थ दर्शिनी<br>ब्रह्मसूत्रांवरील प्रचलित भाषेत लिहिलेले प्राचार्यांचे ओवीबद्ध भाष्य | नवीन आवृत्ती प्रकाशनाचे मार्गावर |
| ३२) | ब्रह्मसूत्रार्थ दर्शिनी गद्य रूपांतर<br>सौ. वसुधा ग. परांजपे यांनी साक्षेपाने केलेला वरील ग्रंथाचा गद्य अनुवाद | १२० |
| ३३) | भगवान् श्रीकृष्ण एक दर्शन<br>सद्य:स्थितीचा परामर्श घेत भगवान् श्रीकृष्णांच्या राजनीतीचे दर्शन घडवणारा मौलिक ग्रंथ | १६० |
| ३४) | LORD SHRIKRISHNA THE REVERED POLITICIAN - BY ATHAVLE<br>भगवान् श्रीकृष्ण एक दर्शनचा कै. प्रभाकर शिवराम सबनीस यांनी केलेला इंग्रजी अनुवाद | उपलब्ध नाही |
| ३५) | भजगोविंदम्<br>श्रीमद्शंकराचार्यांच्या रचनेवरील प.पू. स्वामींचे प्रवचन | ३० |
| ३६) | भावमुक्तावली (आवृत्ति १४ वी)<br>प.पू. स्वामी वरदानंदभारती यांच्या आरती–प्रार्थनेसह संपादित केलेली आवृत्ति | १५ |
| ३७) | भावार्चना<br>पू. अप्पांच्या अध्यात्मिक विकासावर प्रकाश टाकणाऱ्या, निसर्गवर्णने, राष्ट्रभक्ती, देशप्रेम इत्यादी विविधांगांनी नटलेल्या अनेक भावपूर्ण कविता | ११० |
| ३८) | भावानुवाद<br>संस्कृत स्तोत्रे, आरत्या, स्तवन इ. चा पू. अप्पांनी केलेला ओविबद्ध मराठी अनुवाद | २० |
| ३९) | मनुस्मृति भूमिका<br>मनुस्मृतितील सर्वच विषयांचा सुंदर परामर्श घेणारी स्वामीजींची भूमिका | ५० |
| ४०) | मनुस्मृति चिंतनिका<br>वरील ग्रंथाचा श्रीराम र. आळेकर (इंदोर) यांनी केलेला हिंदी अनुवाद | २५ |
| ४१) | मनोबोध (विषयानुक्रमणिकेसह)<br>श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या 'मनाचे श्लोक' या प्रकरणावरील अत्यंत सोपे व उद्बोधक पू. अप्पांचे गद्य विवेचन | २५० |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| ४२) | मनोबोध (हिंदी अनुवाद)<br>मनोबोध ग्रंथाचा श्रीराम र. आळेकर यांनी केलेला हिंदी अनुवाद | १५० |
| ४३) | **MANOBODH**<br>मनोबोध ग्रंथाचा श्री. श्रीकांत नवाथे यांनी केलेला इंग्रजी अनुवाद | ६५० |
| ४४) | महाभारताचे वास्तवदर्शन<br>महाभारतातील थोर व्यक्तिरेखांचे चारित्र्यहनन करणाऱ्या आक्षेपांच्या संदर्भात खंडनात्मकरीत्या महाभारतातील घटनांचे वास्तव दर्शन घडवणारा ग्रंथ | १५० |
| ४५) | मायावाद व चिद्विलासवाद<br>या विषयावरील काही शंकांचे निरसन | २५ |
| ४६) | यक्षप्रश्न – महाभारतातील यक्षप्रश्न या महत्त्वाच्या प्रकरणावरील विवेचन | ६० |
| ४७) | राष्ट्रसंरक्षण पोवाडा<br>हिंदूंच्या अवनतीची मीमांसा करणारा व राष्ट्रीय समस्यांचा आढावा घेऊन उपाय सांगणारा पोवाडा | स्वेच्छा मूल्य |
| ४८) | रुक्मिणी स्वयंवर (ओवीबद्ध)<br>देवी रुक्मिणीच्या विवाह प्रसंगाचे वर्णन | २५ |
| ४९) | वाटा आपल्या हिताच्या (प्रश्नोत्तर रूप)<br>युवकांकडून विचारल्या जाणाऱ्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक प्रश्नांची दिलेली उत्तरे | ८० |
| ५०) | विराण्या<br>श्रीसंत तुकाराम महाराजांच्या मधुराभक्ती सूचित करणाऱ्या अभंगांवरील रसाळ विवरण | १० |
| ५१) | श्रीअनुवाद ज्ञानेश्वरी (नित्यपाठ)<br>अनुवाद ज्ञानेश्वरी ग्रंथातील निवडक ओव्या | १२ |
| ५२) | श्रीकृष्णकथामृत<br>भगवान् श्रीकृष्णांच्या चरित्रावरील पादाकुलक वृत्तातील अठरा सर्गांचे महाकाव्य | २५० |
| ५३) | श्रीगोदास्तोत्रम्<br>प.पू. अप्पांच्या ''श्रीगोदास्तोत्रम्' या संस्कृतरचनेचा डॉ. ग.प्र.परांजपे यांनी केलेला मराठी अनुवाद | २० |
| ५४) | श्रीमनुस्मृति सार्थ–सभाष्य<br>संपूर्ण मनुस्मृतीचा श्लोकानुरोधाने स्वामीजींनी केलेला मराठी अनुवाद, याशिवाय निरनिराळे सामाजिक ज्वलंत विषय, ज्वलंत प्रश्नांची मीमांसा करणारी भूमिका व संदर्भ परिशिष्टे | ७०० |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| | **श्रीमद् भगवत्गीतेच्या १८ अध्यायावरील प्रासादिक विवेचन** | |
| ५५) | गीताप्रवेश – अध्याय पहिला | ६० |
| ५६) | स्थितप्रज्ञयोग – अध्याय दुसरा | ७५ |
| ५७) | कर्मयोग – अध्याय तिसरा | १६० |
| ५८) | ज्ञानकर्मसंन्यासयोग – अध्याय चवथा | ८० |
| ५९) | कर्मसंन्यासयोग – अध्याय पाचवा | ६० |
| ६०) | आत्मसंयमयोग – अध्याय सहावा | १४० |
| ६१) | ज्ञानविज्ञानयोग – अध्याय सातवा | १२५ |
| ६२) | अक्षरब्रह्मयोग – अध्याय आठवा | ५० |
| ६३) | राजयोग – अध्याय नववा | ६० |
| ६४) | विभूतियोग – अध्याय दहावा | ४५ |
| ६५) | विश्वरूपदर्शनयोग – अध्याय अकरावा | ५० |
| ६६) | भक्तियोग – अध्याय बारावा | १६० |
| ६७) | तत्त्वविज्ञान – अध्याय तेरावा | ५० |
| ६८) | गुणत्रयविभागयोग – अध्याय चौदावा | १५० |
| ६९) | पुरुषोत्तमयोग – अध्याय पंधरावा | ५० |
| ७०) | दैवासुरसंपद्विभागयोग – अध्याय सोळावा | ५० |
| ७१) | श्रद्धात्रयविभागयोग– अध्याय सतरावा | ८० |
| ७२) | जीवनसाधना– अध्याय अठरावा | १७५ |
| ७३) | जीवनसाधना (हिंदी) – अध्याय अठराव्याचा डॉ. स्मिता दात्ये यांनी केलेला हिंदी अनुवाद | १२५ |
| ७४) | श्रीवरदगीता प्रदीप श्रीकृष्णकथामृतातील सर्ग १६ 'मोहनिरास' वरील प.पू. अप्पांच्या प्रवचनाचे आधारे सौ. वसुधा परांजपे यांनी केलेले लेखन | ४० |
| ७५) | श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र – केवळ पाठसंहिता | ०५ |
| ७६) | श्रीविष्णुसहस्रनाम (सार्थ) श्रीविष्णुसहस्रनामाचे सोप्या भाषेत केलेले अर्थविवरण, उत्तम प्रस्तावना, तसेच जपव्रत पूर्वाङ्ग, आणि फलश्रुति यांचे सार्थ विवरण | ५० |
| ७७) | श्रीविष्णुसहस्रनाम (सार्थ – हिंदी) वरील ग्रंथाचा डॉ. स्मिता दात्ये यांनी केलेला हिंदी अनुवाद | २५ |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| ७८) | श्रीशककर्ता शालिवाहन<br>सरस्वतीकवि श्री. मो.बा.रवंदे यांनी प.पू. अप्पांनी रचलेल्या व पुरवणी काव्याचे केलेले सुलभ मराठी भाषांतर | १७५ |
| ७९) | श्रीसद्‌गुरु षोडशोपचार पूजा (ओवीबद्ध)<br>अ. दा. आठवले यांनी श्रीसद्‌गुरु दासगणू महाराजांची केलेली यथासांग पूजा | १० |
| ८०) | शिवमहिम्नस्तोत्र<br>स्तोत्राचा ओवीबद्ध अनुवाद | २० |
| ८१) | शिवस्तुति–नमनानुवाद<br>श्रीकृष्णकथामृतातील प्रत्येक सर्गारंभीच्या शिवस्तुतीपर संस्कृत श्लोकांचा डॉ. ग. प्र. परांजपे यांनी केलेला अनुवाद | ६ |
| ८२) | सत्संगति–सुगंध<br>श्री. छ. मा. बारटक्के यांनी लिहिलेल्या प.पू. दासगणू महाराज आणि स्वामी वरदानंदभारती विषयींच्या आठवणी | १०० |
| ८३) | समन्वयाद्वैत दर्शन<br>पी.एच्.डी. पदवीसाठी सौ. कल्याणी नामजोशी यांचा स्वामी वरदानंदभारती आणि इतर प्रमुख पांच आचार्यांच्या उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा तौलनिक प्रबंध ग्रंथ | ४०० |
| ८४) | सर्वांसवे श्रीहरि<br>प.पू. अप्पांनी रचलेल्या संस्कृत संतस्तोत्रांचा भागवताचार्य वा.ना. उत्पात यांनी लिहिलेला मराठी गद्यार्थ | २० |
| ८५) | साधक साधना – साधन चतुष्टयाचे सविस्तर विवरण | १७५ |
| ८६) | साधकाची चिंतनिका<br>श्रीशंकराचार्यांच्या ‘ते धन्या:, चित्तप्रसाद आणि प्रात:स्मरण’ प्रकरणांवरील विवेचन | १५ |
| ८७) | स्वराज्याचा पोवाडा<br>स्वातंत्र्यानंतर २७ वर्षांच्या सामाजिक परिस्थितीचे वास्तव वर्णन | ५ |
| ८८) | संघप्रार्थना<br>रा. स्व. संघप्रार्थनेचे सार्थ स्पष्टीकरण | ४० |
| ८९) | संघप्रार्थना (हिंदी अनुवाद)<br>वरील पुस्तकाचा श्रीराम. र. आळेकर यांनी केलेला हिंदी अनुवाद | १५ |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| ९०) | हिंदू धर्म समजून घ्या<br>हिंदू धर्माचे प्राचीनत्व आणि त्यांची वैशिष्ट्ये यांचे सोदाहरण विवेचन. हिंदूधर्मासंबंधीचा एक संग्राह्य ग्रंथ. | ३० |
| ९१) | ही अनंतसंपदा<br>प.पू. अप्पांच्या समग्र वाङ्मयाचे श्री. ग. प्र. परांजपे यांनी विविध लेखकांकरवी करून घेतलेले आस्वादक परीक्षण | ८० |
| ९२) | हीच गुरुपूजा खरी<br>प.पू. स्वामीजींच्या प्रकाशित साहित्यातील ३६५ निवडक विचारांचे सौ. वसुधा ग. परांजपे यांनी केलेले संकलन | २०० |

## संतकवी श्री दासगणू महाराज यांची ग्रंथसंपदा

| | | |
|---|---|---|
| १) | अमृतानुभव भावार्थमंजिरी<br>श्रीज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभव' ग्रंथावरील श्रीमहाराजांचे सर्वजन सुलभ भाष्य | २०० |
| २) | उपदेशपर पद्ये – पूर्वरंगासाठी आवश्यक असलेल्या पद्यांचा संग्रह | २० |
| ३) | उद्धवागमन – श्रीमहाराजांनी रचलेले भावमधूर खंडकाव्य | २५ |
| ४) | छात्रबोध – श्रीमहाराजांनी श्रीअनंतरावांना केलेला बोध | ८ |
| ५) | नादब्रह्म<br>पूर्वरंगपदे, कीर्तनाख्यानातील व कृष्णकथामृतातील वेगवेगळ्या पदांच्या चालींचे श्री.छ.मा. बारटक्के यांनी केलेले, स्वरांकन | १५० |
| ६) | पासष्टीभावार्थदीपिका<br>श्रीज्ञानेश्वरांनी चांगदेवाच्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून लिहिलेल्या पासष्ट ओव्यांवरील भाष्य | ४० |
| ७) | पुरवणी खंड – श्रीदासगणु महाराजांच्या समग्र वाङ्मयाचा पुरवणी खंड | उपलब्ध नाही |
| ८) | पोवाडे – श्रीमहाराज रचित तानाजी मालुसरे, झाशीची राणी इ. पोवाडे | ३० |
| ९) | भक्तिरसायन भावदीपिका | १३ |
| १०) | भजनावली (आवृत्ती ८ वी)<br>श्रीदासगणू महाराज रचित सायंकाळची भजने | १५ |
| ११) | श्री गुरुचरित्र सारामृत<br>मूळ गुरुचरित्रातील सर्व कथाप्रसंग साररूपाने व सुलभतेने रचलेले श्रीमहाराजांचे प्रासादिक काव्य | ८० |

| क्र. | ग्रंथाचे नाव | मूल्य रु. |
|---|---|---|
| १२) | श्रीगोदा माहात्म्य<br>ब्रह्मपुराणातील मूळ गोदामहात्म्याचे आधारे श्रीमहाराजांनी लिहिलेला ओवीबद्ध ग्रंथ | ८० |
| १३) | श्रीगौडपादकारिका (विवरण)<br>श्रीगौडपाद यांच्या कारिकांचा श्रीमहाराजांनी<br>अत्यंत सोप्या भाषेत केलेला ओविबद्ध अनुवाद | ५० |
| १४) | श्रीईशावास्य भावार्थ बोधिनी व मंत्रार्थ प्रकाशिका<br>मानवाला सत्याचे ज्ञान करवून देणाऱ्या ईशावास्य उपनिषदावरील<br>श्रीमहाराजांची ओवीबद्ध टीका | ६० |
| १५) | श्रीनागझरी महात्म्य<br>विदर्भातील गोमाजी महाराजांचे ओवीबद्ध चरित्र | ४० |
| १६) | श्रीनारद–भक्तिसूत्र–बोधिनी<br>देवर्षी नारदांच्या भक्तिपर ८४ सूत्रावरील श्रीमहाराजांची ओवीबद्ध टीका | ५५ |
| १७) | श्रीभक्तिलीलामृत (अर्वाचीन)<br>श्रीसाईनाथांच्या आज्ञेवरून श्रीमहाराजांनी लिहिलेली संतांची ओवीबद्ध चरित्रे | २०० |
| १८) | श्रीभक्तिसारामृत<br>महिपतीबुवानंतर झालेल्या संतांची श्री महाराजांनी लिहिलेली ओवीबद्ध संतचरित्रे | १५० |
| १९) | श्रीमध्वविजय – मध्वाचार्यांवरील चरित्रपर ग्रंथ | ५० |
| २०) | श्रीमांगीशमाहात्म्य – शिखर–शिंगणापूर महादेवाचे महात्म्य | ६० |
| २१) | श्रीविष्णुसहस्रनामबोधिनी<br>श्रीविष्णुसहस्रनामाचे श्रीमहाराजांनी रचलेले ओवीबद्ध साररूप | २० |
| २२) | श्रीशनिप्रताप – श्री दासगणुमहाराज रचित ओविबद्ध ग्रंथ | २५ |
| २३) | श्रीशंकराचार्य चरित्र (ओवीबद्ध)<br>आद्य शंकराचार्यांचे श्रीमहाराजांनी रचलेले भक्तिरसप्रधान चरित्र | २५० |
| २४) | श्रीशांडिल्य भक्तिसूत्र भावदीपिका<br>संस्कृत शांडिल्यसूत्रावर श्रीमहाराजांची ओवीबद्ध टीका | ५० |
| २५) | श्रीसंतकथामृत (अर्वाचीन)<br>श्रीसाईनाथांच्या आज्ञेवरून श्रीमहाराजांनी लिहिलेली संतांची ओवीबद्ध चरित्रे | ७५ |
| २६) | सुबोध लघुकथा<br>अनेक प्रकाराने हितोपदेश करणाऱ्या गद्य कथा | ३० |

२७) संतकवी श्रीदासगणू महाराज चरित्र आणि काव्य विवेचन ३००
प्राचार्य श्री. अ. दा. आठवले लिखित श्रीदासगणू महाराजांचे चरित्र

२८) **SAINT POET DASGANU** १२५
वरील ग्रंथावर आधारित श्री. रामचंद्र सातपुते यांनी केलेले इंग्रजी भाषांतर (संक्षिप्त)

२९) संतकवि श्रीदासगणू : वाङ्मयीन अभ्यास ७५
विद्यावाचस्पती पदवीसाठी केलेला श्री. ग. प्र. परांजपे यांचा शोधनिबंध

३०) हितबोध – श्रीदासगणु महाराजांचे राष्ट्रोद्धारक विचार ६

## कीर्तनोपयोगी आख्याने – आणि इतर ग्रंथ

| क्र. | ग्रंथाचे नाव | किंमत | क्र. | ग्रंथाचे नाव | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री देवी अहिल्याबाई चरित्र | १५=०० | २३. | श्री मच्छिंद्रनाथ चरित्र | १२=०० |
| २. | बापू गोखले व श्रीबिल्वमंगल चरित्र | २२=०० | २४. | श्री माणकोजी बोधले चरित्र | १०=०० |
| ३. | श्री चांगदेव चरित्र (उत्तरार्ध) | २०=०० | २५. | श्री संत मीराबाई चरित्र | १५=०० |
| ४. | श्री चांगदेव चरित्र (पूर्वार्ध) | १०=०० | २६. | श्री मुकुंदराज चरित्र | १०=०० |
| ५. | श्री संत चोखा महार चरित्र | १५=०० | २७. | श्री नरसी मेहेता चरित्र | १२=०० |
| ६. | श्री दत्तजन्म चरित्र | १०=०० | २८. | श्री नरहरी अवतार (संपूर्ण व संक्षिप्त) | ४=०० |
| ७. | श्री दादाजी चरित्र | ६=०० | २९. | श्री नरहरी सोनार चरित्र | १५=०० |
| ८. | श्री संत दामाजी चरित्र | ५=०० | ३०. | श्री नामदेव चरित्र | १५=०० |
| ९. | श्री धनेश्वर चरित्र | ७=०० | ३१. | श्री परशुराम जन्माख्यान | १०=०० |
| १०. | श्री एकनाथ चरित्र | २०=०० | ३२. | श्री राजा दाहीर चरित्र (श्री. अ. दा. आठवले कृत) | २०=०० |
| ११. | श्री गजानन महाराज चरित्र | १५=०० | ३३. | श्री रामदास चरित्र | ५=०० |
| १२. | श्री गीता–जन्म–कथा | १०=०० | ३४. | श्री रामजन्माख्यान | १०=०० |
| १३. | श्री गोपालकाला | १०=०० | ३५. | श्री रुक्मिणी स्वयंवर (श्री. अ. दा. आठवले कृत) | २५=०० |
| १४. | श्री भक्त गोराकुंभार चरित्र | १०=०० | ३६. | श्री रोहिदास चरित्र | ६=०० |
| १५. | श्री जगन्नाथ पंडित चरित्र | ५=५० | ३७. | श्री साईबाबा चरित्र | ७=०० |
| १६. | श्री संत जनाबाई चरित्र | १०=०० | ३८. | श्री सावतामाळी चरित्र | १६=०० |
| १७. | श्री जालंदरनाथ चरित्र | २०=०० | ३९. | श्री सुदाम चरित्र | ७=०० |
| १८. | श्री कबीर चरित्र | १५=०० | ४०. | श्री संत सेनान्हावी चरित्र | १०=०० |
| १९. | श्री कान्होपात्रा आख्यान | १०=०० | ४१. | श्री संत सखू चरित्र | १०=०० |
| २०. | श्री कूर्मदास चरित्र | १०=०० | | | |
| २१. | श्री लाखा भक्त चरित्र | १५=०० | | | |
| २२. | श्री लोकमान्य टिळक चरित्र | ९=०० | | | |

| क्र. | ग्रंथाचे नाव | किंमत | क्र. | ग्रंथाचे नाव | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ४२. | छत्रपती शिवाजी महाराज चरित्र | १०=०० | ४८. | श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र | १५=०० |
| ४३. | श्री शेख महंमद चरित्र | १०=०० | ४९. | श्री. अनंत चरित्र (श्री. विश्राम नांदेडकर रचित स्वामी वरदानंदभारतींचे चरित्र) | ३०=०० |
| ४४. | श्री मदाद्य शंकराचार्य चरित्र | १०=०० | ५०. | श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकर चरित्र (श्री रवंदे कृत) | ५=०० |
| ४५. | तीन पौराणिक आख्याने (श्रीवत्सला हरण, श्रीगरुड गर्वहरण, श्री हनुमान सेवा) | २०=०० | ५१. | कान्ह्या भिन्न प्रसंग (डॉ. ग. प्र. परांजपे रचित) | १२=०० |
| ४६. | श्री संत तुकाराम चरित्र | १७=०० | | | |
| ४७. | श्री तुलसीदास चरित्र | १०=०० | | | |

## स्तोत्रे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री अंबिका स्तोत्र | १०=०० | ७. | श्री पांडुरंग स्तोत्र | ४=०० |
| २. | श्री गणेशस्तवराज | ७=०० | ८. | श्री पांडुरंग स्तोत्र (छोटी पुस्तिका) | २=०० |
| ३. | श्री महालक्ष्मी स्तोत्र | १०=०० | ९. | श्री पांडुरंग स्तोत्र (सचित्र) | ५०=०० |
| ४. | नमः शिवाय सर्वदा | १५=०० | १०. | श्री व्यंकटेश स्तोत्र | ७=०० |
| ५. | श्री संत स्तोत्र | १०=०० | ११. | श्री मोहिनीराज स्तोत्र | १०=०० |
| ६. | श्री गायत्री स्तव | १५=०० | | | |

## सौ. प्रियंवदा नवाथे यांनी केलेले कीर्तनाख्यानातील पदांचे स्वरांकन

| | | |
|---|---|---|
| १. | श्री लाखा भक्त चरित्र | ४०=०० |
| २. | श्रीसंत मिराबाई चरित्र | ४०=०० |
| ३. | श्रीरामदास चरित्र | ४०=०० |

प.पू. स्वामी वरदानंदभारती यांच्या कीर्तने, प्रवचने, व्याख्याने, प्रश्नोत्तरे इत्यादींच्या ऑडिओ/व्हिडिओ सिडीज् तसेच ऑडिओबुक्स श्रीदासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे आणि श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे येथे मिळतील.

## समग्र वाङ्मय मिळण्याची ठिकाणे

(१) श्रीराधादामोदर प्रतिष्ठान :
श्री. वामन वि. मेहेंदळे (मोबा. : ०९४२०४ ९५३०८)
श्री. प्र. वि. मेहेंदळे (मोबा. : ०९९७५९ ६६१८१)
'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणे ४११०३०.

(२) श्री दासगणू महाराज प्रतिष्ठान :
कु. गार्गी देशपांडे (मोबा. : ०९४२१९ ०१०९८, ०७५०७१ १४११५)
मु. पो. गोरटे– ४३१८०७, व्हाया उमरी, जिल्हा नांदेड.

(३) वि.वा. कल्याणी माधव नामजोशी (दूरध्वनी : ०२०–२५६५४८६६)
'पुष्कराज', मित्रनगर, १०१२/४ शिवाजीनगर,
पुणे – ४११०१६.

(४) यशवंत प्रकाशन, (दूरध्वनी : ०२०–२४४७ ०५३३)
७५३ सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणे ४११०३०.

(५) न्यू नेर्लेकर बुक सेलर्स (मोबा : ०९४२३५ ८०८३७)
२६१/१अ/१, बुधवार चौक, पुणे ४११००२.

(६) सौ. मीना रमेश वाटवे, (दूरध्वनी : ०२५३–२३१३२६२)
जयप्रसाद रेसिडेन्सी, ब्लॉक क्र. १७,
जुनी पंडित कॉलनी, नाशिक ४२२००२.

(७) डॉ. स्वाती शिरडकर, (मोबा. : ०९८९०८ ९८०७८)
'मानस', १३/१ विनायक नगर,
हेडगेवार हॉस्पिटल जवळ, त्रिमूर्ती चौक,
औरंगाबाद ४३१००३.

(८) श्री. दिगंबर सेंदूरवाडकर, (दूरध्वनी : ८५५४९ ९५०१७)
'श्रीसाई गजानन', त्रिमूर्ती नगर, परभणी ४३१४०१.

(९) देबडवार पुस्तक भांडार (मोबा. : ०९४२३६ १५१२७)
महावीर चौक, नांदेड ४३१६०१.

(१०) श्री. प्रशांत रघुनाथ सबनीस (मोबा. : ९४२०२ ६०५१४)
मु.पो. सज्जनगड – ४१५०१३, जि. सातारा.